पुण्य नगरी
SMART
नागपूर, बुधवार, २५ मे २०२२

# 'जीपॅट' परीक्षेत अनुराधा फार्मसीचा मनीष तायडे देशातून तेरावा

**चिखली**, दि. २४ (प्रतिनिधी)





फार्मसीच्या क्षेत्रात अत्यंत महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या तसेच राष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या 'जीपॅट' या परिक्षेमध्ये अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी चिखलीच्या मनिष तायडे या विद्यार्थ्याने भारतातून १३ वा क्रमांक पटकाविला आहे. याशिवाय या परीक्षेत २७ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

सदर परीक्षेमध्ये संपूर्ण भारतभरातील १४०० पेक्षा अधिक फार्मसी महाविद्यालयातील ५०५०८ फार्मसी पदवी घेणारे विद्यार्थी सहभागी होतात. यावर्षी भारतभरातील तब्बल ५० हजारापेक्षा जास्त विद्यार्थ्यांमधून अनुराधा फार्मसीचा मनिष तायडे याने १३ वा क्रमांक पटकावला. तर अमोल सातपुते हा ७४ व्या स्थानी राहिला. तर अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसीच्या तब्बल २७ विद्यार्थ्यांनी या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय परीक्षेत यश संपादन करून अनुराधा फार्मसी महाविद्यालय विदर्भातील सर्वात उत्कृष्ट महाविद्यालय असल्याचे पुन्हा एकदा सिध्द केले आहे. या परीक्षेत यश मिळविणाऱ्यांमध्ये मनिष तायडे, अमोल सातपुते, दीपक काळे, वैष्णवी शेरे, गणेश आसबे, गंगाधर शिंदे, अंजली गुघे, जयेश मसने, रूपाली पिंपळे, मयुरी वानखेडे, श्वेता वानेरे, जितेंद्र हिवरकर, राहुल सपकाळ, मानसी गुप्ता, रेणुका झरेकर, स्नेहल गायकवाड, रसिका बाभुळकर, चंदन सरकटे, शितल पोहरे, विकास वाणी, सय्यद अमन, दीपक डाबेराव, योगेश कव्हाळे, पवन नागरे, धम्मसेन जाधव, सय्यद शुजातुल्ला, विनायक रसाळ यांचा समावेश आहे. त्यांना महाविद्यालयाचे अध्यक्ष माजी आमदार राहुलभाउ बोंद्रे, उपाध्यक्ष डॉ. व्हि.आर. यादव, सचिव ॲड.वृषालीताई बोंद्रे, कोषाध्यक्ष सिध्देश्वर वानेरे यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे भरभरून कौतुक करीत अभिनंदन केले आहे. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. आर. बियाणी, प्राचार्य डॉ. आर. एच. काळे, प्राचार्य डॉ.आर.आर. पागोरे, प्रा.यू.एम. जोषी, प्रा. एस. एस.कुलकर्णी, जीपॅट कोऑरडीनेटर प्रा.ई.बी. कोल्हे, प्रा.एम.व्ही. तोटे, यांनी अथक परिश्रम घेतले.

# अनुराधा फार्मसीमध्ये १५१ विद्यार्थ्यांचे रक्तदान



रक्तदान शिबिराला उपस्थित बियाणी, काळे, पागोरे व अन्य.

लोकमत न्यूज नेटवर्क

**बुलढाणा :** अनुराधा ग्रुप ऑफ फार्मसी इन्स्टिट्यूटसच्या अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी चिखली येथे २६ सप्टेंबर रोजी जागतिक औषध निर्माता दिवस व रा.से.यो. दिनाचे औचित्य साधून रा.से.यो. पथकाद्वारे रक्तदान शिबिर घेण्यात आले. यावेळी १५१ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

रेड रिबन क्लबच्या संयुक्त विद्यमाने एच.आय.व्ही.एड्स रक्त तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरामध्ये शासकीय रक्तपेढी सामान्य जिल्हा रुग्णालय बुलडाणा व जीवनधारा बुलडाणा, रक्तपेढी व लीलावती रक्तपेढी बुलडाणा यांनी सहभाग घेतला होता. यावेळी रक्तपेढीचे संयोजक झगरे, भक्कड व शिरसाठ आदी उपस्थित होते. रेड रिबन क्लबच्या आयसीटीसी कौन्सिलर चिखली तालुकाप्रमुख भावना कैंबेल आणि विलास गवळी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ ग्रामीण रुग्णालय चिखली यांनी एकूण १२५ विद्यार्थ्यांची एच.आय.व्ही.ची तपासणी केली. यावेळी संस्थाध्यक्ष राहुल बोंद्रे, सचिव ॲड. वृषाली बोंद्रे व कोषाध्यक्ष सिद्धेश्वर वानेरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. आर. बियाणी, आर. एच. काळे, आर. आर. पागोरे आदी उपस्थित होते. यावेळी प्रा. यू. एम. जोशी, एस. एस. कुलकर्णी, डी. पी. अंभोरे, डॉ. पी. बी. दुधे उपस्थित होते. शिबिरासाठी प्रा. सूरज सगरुळे, प्रा. राहुल सरोदे, डॉ. एस. ए. शिंदे, एस. डी. तुपकर, प्रा. सोनाली मुंढे यांनी परिश्रम घेतले.

# अनुराधा फार्मसीच्या १९ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीमध्ये निवड

## अंतिम परीक्षेपूर्वीच मिळाले नियुक्तीपत्र

**चिखली**, दि. २३ (प्रतिनिधी)

स्थानिक अनुराधा औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील १९ विद्यार्थ्यांची उत्तराखंड येथील वंडर कंपनीच्या प्रीतम इंटरनॅशनल लिमिटेड या कंपनीकडून निवड करण्यात आली आहे. प्लेसमेंट ड्राईव्हच्या माध्यमातून सध्या विद्यार्थ्यांना चांगल्या कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी मिळत आहेत. महाविद्यालयामध्ये सुरू असलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच १९ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली आहे.

कंपनीकडून प्रोडक्शन, क्वालिटी, स्टोर, मार्केटिंग, परचेस आणि प्लानिंग या विविध क्षेत्रांमध्ये नोकरीच्या संधी देण्यासाठी हा कॅम्पस इंटरव्ह्यू घेण्यत आला. यावेळी निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये श्वेता वानरे, रुपाली सोनुने, निकिता शर्मा, पूनम घुबे, अन्वेषका गवई, रुपाली पिंपळे, अनिकेत सपकाळ, ह्रशिकेश ढाले, सौरभ बोंद्रे, जयेश तुंडलायत, समाधान राठोड, ह्रशिकेश मोहरुत, अमर शिंदे, कनक भोजने, शुभम महाजन, गौरव दलाल, शंतनू गवळी, स्नेहल गायकवाड, भूषण मंडळकर यांची निवड झाली व नियुक्ती पत्र मिळाले. याप्रसंगी महाविद्यालयाचे अध्यक्ष राहुल बोंद्रे, उपाध्यक्ष डॉ व्ही.आर यादव, सचिव ॲड. वृषाली बोंद्रे, कोषाध्यक्ष सिद्धेशवर वानरे आदींची उपस्थिती होती. यासाठी प्राचार्य डॉ.के.आर.बियाणी, प्राचार्य डॉ.आर.एच.काळे, प्राचार्य डॉ.आर.आर.पागोरे, प्लेसमेंट डायरेक्टर प्रा.यु.एम.जोशी, प्रा.दीप्ती भागवत, प्रा.गोपाल ठेंग यांनी परिश्रम घेतले

# अनुराधा फार्मसीच्या १९ विद्यार्थ्यांची कंपनीमध्ये निवड



देशोन्नती वृत्तसंकलन...

**चिखली** ■ कौशल्य प्राप्त करून देणाऱ्या औषध निर्माण शास्त्र विषयाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या चांगल्या संधी मिळत आहेत. याच क्षेत्रामध्ये आपली एक वेगळी ओळख बनवून असलेल्या चिखली येथील अनुराधा औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयाने आपली नेहमीची परंपरा जपत यावर्षी सुद्धा नामांकित कंपनीमध्ये १९ विद्यार्थ्यांची निवड सार्थ ठरवलेली आहे.

औषध निर्माणशास्त्र पदविका, पदवी व पदव्युत्तरच्या अखेरच्या वर्षातील विद्यार्थ्यांचे शेवटचे सत्र सध्या सुरू असून महाविद्यालयातूनच विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळावी, या उद्देशानेच कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन केले जात आहे. अनुराधा औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयातील १९ विद्यार्थ्यांची उत्तराखंड येथील वंडर कंपनीच्या प्रीतम इंटरनॅशनल लिमिटेड या कंपनीकडून निवड करण्यात आली आहे. प्लेसमेंट ड्राईव्हच्या माध्यमातून सध्या विद्यार्थ्यांना चांगल्या कंपन्यामध्ये नोकरीच्या संधी मिळत आहेत. महाविद्यालयाची ३० वर्षाची परंपरा उपलब्ध असलेल्या अध्यापनाच्या व्यवस्था, प्रात्यक्षिक सुविधा, उच्चशिक्षित प्राध्यापकांमुळे, इंडस्ट्रीकरीता आवश्यक असलेले ज्ञान प्राप्त झाल्यामुळे औषध कंपन्या विद्यार्थ्यांची निवड करत आहेत व विद्यार्थ्यांना पदवी पूर्ण होण्यापूर्वीच नोकरी मिळत आहे. प्रसंगी महाविद्यालयाचे अध्यक्ष राहुल बोंद्रे, उपाध्यक्ष डॉ. व्ही.आर.यादव, सचिव ॲड. सौ.वृषालीताई बोंद्रे, कोषाध्यक्ष सिद्धेशवर वानरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्रसंगी प्राचार्य डॉ.के.आर.बियाणी, प्राचार्य डॉ. आर.एच.काळे, प्राचार्य डॉ. आर. आर. पागोरे, प्लेसमेंट डायरेक्टर प्रा.यु.एम.जोशी, प्रा. दीप्ती भागवत, प्रा.गोपाल ठेंग यांनी परिश्रम घेतले. (ता.प्र.)

## अंतिम परीक्षेपूर्वीच विद्यार्थ्यांना मिळाले नियुक्ती पत्र..

महाविद्यालयामध्ये सुरू असलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून **शिक्षण पूर्ण** होण्यापूर्वीच १९ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली आहे. कंपनीकडून प्रोडक्शन, क्वालिटी, स्टोर, मार्केटिंग, परचेस आणि प्लॅनिंग या विविध क्षेत्रांमध्ये नोकरीच्या संधी देण्यासाठी हा कॅम्पस इंटरव्ह्यू घेण्यात आलेल्यांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे अनुक्रमे श्वेता वानरे, रुपाली सोनुने, निकिता शर्मा, पूनम घुबे, अन्वेषका गवई, रुपाली पिंपळे, अनिकेत सपकाळ, ऋषिकेश ढाले, सौरभ बोंद्रे, जयेश तुंडलायत, समाधान राठोड, ऋषिकेश मोहरुत, अमर शिंदे, कनक भोजने, शुभम महाजन, गौरव दलाल, शंतनू गवळी, स्नेहल गायकवाड, भूषण मंडळकर यांची निवड झाली व नियुक्ती पत्र मिळाले.

# अनुराधा फार्मसीच्या १९ विद्यार्थ्यांची निवड

**बुलडाणा** : औषधनिर्माणशास्त्र पदविका, पदवी व पदव्युत्तरच्या अखेरच्या वर्षातील विद्यार्थ्यांचे शेवटचे सत्र सध्या सुरू असून, महाविद्यालयातूनच विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळावी, या उद्देशानेच कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन केले होते.

अनुराधा औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील १९ विद्यार्थ्यांची उत्तराखंड येथील वंडर कंपनीच्या प्रीतम इंटरनॅशनल लिमिटेड या कंपनीकडून निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये श्वेता वानरे, रूपाली सोनुने, निकिता शर्मा, पूनम घुबे, अन्वेषका गवई, रूपाली पिंपळे, अनिकेत सपकाळ, हृषीकेश ढाले, सौरभ बोंद्रे, जयेश तुंडलायत, समाधान



राठोड, हृषीकेश मोहरूत, अमर शिंदे, कनक भोजने, शुभम महाजन, गौरव दलाल, शंतनू गवळी, स्नेहल गायकवाड, भूषण मंडळकर यांचा समावेश आहे. याप्रसंगी महाविद्यालयाचे अध्यक्ष राहुल बोंद्रे, उपाध्यक्ष डॉ. व्ही. आर. यादव, सचिव ॲड. वृषाली बोंद्रे, सिद्धेश्वर वानरे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. (वा.प्र.)

# अनुराधाच्या ८ विद्यार्थ्यांची लिबेन कंपनीमध्ये निवड

देशोन्नती वृत्तसंकलन...

**चिखली** ▪ अनुराधा औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयाने आपली यशाची घोडदौड कायम राखत पुन्हा एकदा आपल्या ८ विद्यार्थ्यांची औषधनिर्माण कंपनीमध्ये निवड पक्की केली आहे. औषधनिर्माण शास्त्र पदविका, पदवी व पदव्युत्तरच्या अखेरच्या वर्षातील विद्यार्थ्यांचे शेवटचे सत्र सध्या सुरू असून महाविद्यालयातूनच विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळावी, या उद्देशानेच कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन केले जात आहे. अनुराधा औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयातील ८ विद्यार्थ्यांची अकोला येथील लिबेन या फार्मा कंपनीकडून निवड करण्यात आली आहे. प्लेसमेंट ड्राईव्हच्या माध्यमातून सध्या विद्यार्थ्यांना चांगल्या कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी मिळत आहेत. महाविद्यालयात सुरू असलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच यावर्षी आतापर्यंत २७ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली.

कंपनीकडून प्रोडक्शन, क्वालिटी अशुरन्स, क्वालिटी कंट्रोल क्षेत्रामध्ये नोकरीच्या संधी देण्यासाठी हा इंटरव्यू घेण्यात आला. लिबेन कंपनीचे प्रोडक्शन मॅनेजर मनमथ बाळापूरकर व क्वालिटी कंट्रोल मॅनेजर पुरुषोत्तम खरात यांनी पहिली फेरी महाविद्यालयात १३ मे रोजी घेतली. महाविद्यालयाच्या सभागृहात कंपनीचे प्रोफाइल प्रेझेंटेशन देण्यात आले. १३ तारखेला १५ विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड करण्यात आली. दुसरी फेरी २३ मे रोजी लिबेन लॅबोरेटरी अकोला येथे सीईओ पार्थ शहा यांनी घेऊन विद्यार्थ्यांची प्रोडक्शन, क्वालिटी अशुरन्स, क्वालिटी कंट्रोल या विविध डिपार्टमेंटसाठी निवड केली. लेबेन येथे मुलाखतीच्या ३ फेऱ्यानंतर ८ विद्यार्थी निवडले गेले. यामध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे अनुक्रमे रवींद्र आल्हाट,वैशाली भुतेकर, वैभव दळवी, गजानन जाधव, विशाल शिंदे, मंगेश मोहिते, सोमनाथ शिंदे, नेहा सुर्वे यांची निवड झाली व नियुक्ती पत्र मिळाले. अंतिम वर्षाच्या परीक्षा झाल्यानंतर त्यांना रुजू होण्याबाबत कळविले आहे.

प्रसंगी महाविद्यालयाचे अध्यक्ष राहुल बोंद्रे, उपाध्यक्ष डॉ.व्ही.आर.यादव, सचिव सौ.वृषालीताई बोंद्रे, कोषाध्यक्ष सिद्धेशवर वानेरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्रसंगी प्राचार्य डॉ.बियाणी, प्राचार्य डॉ.काळे, प्राचार्य डॉ.पागोरे, प्लेसमेंट डायरेक्टर प्रा.यु.एम.जोशी, प्रा.दीप्ती भागवत, प्रा. गोपाल ठेंग यांनी परिश्रम घेतले. (ता.प्र.)

# माजी आ.राहुल बोंद्रे यांच्या वाढदिवसानिमित्त अनुराधा फार्मसीच्या १५१ विद्यार्थ्यांचे रक्तदान



देशोन्नती वृत्तसंकलन...

**चिखली** ■ तब्बल १५१ विद्यार्थ्यांनी केले उत्स्फूर्तपणे रक्तदान परमहंस रामकृष्ण मौनीबाबा शिक्षण संस्थेचे सचिव मा.राहुलभाऊ बोंन्द्रे यांच्या वाढदिवसाचे औचीत्य साधून अनुराधा औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना पथकद्वारे ०९ मे २०२२ सोमवार रोजी महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. रक्तसंकलनासाठी बुलढाणा येथील जीवनधारा बुलढाणा अर्बन रक्तपेढी तसेच शासकीय रक्तपेढी बुलढाणा व त्यांचे चमू या रक्तपेढयांनी सहभाग घेतला. सदर शिबीरा मध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरामध्ये तब्बल १५१ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.आर. बियाणी, प्राचार्य डॉ.आर.एच. काळे, प्राचार्य डॉ.आर.आर. पागोरे यांनी रक्तदात्यांचे अभिनंदन करून त्यांचा उत्साह वाढविला शिबीर प्रसंगी प्रा. यु.एम. जोशी, प्रा.एस.एस. कुलकर्णी व डॉ.आशिष गवई हे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. सुशीलकुमार शिंदे, प्रा.राहुल सरोदे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा.सुरज सगरुळे, प्रा.सचिन गाडेकर, प्रा.सुजाता दुधे, प्रा. सोनाली मुंढे, प्रा. पल्लवी गाडेकर, रा. से.यो. प्रतिनिधी वैभव ठेंग व तुळशीदास सोनुने यांनी सहकार्य केले. (ता.प्र.)

# अनुराधा फार्मसीचा मनिष तायडे 'जीपॅट' परीक्षेत भारतातून १३ वा



देशोन्नती वृत्तसंकलन...

**चिखली** ■ फार्मसीच्या क्षेत्रात अत्यंत महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या तसेच राष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या 'जीपॅट' या परिक्षेमध्ये अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी चिखलीच्या मनिष तायडे या विद्यार्थ्याने भारतातून १३ वा क्रमांक पटकावत, अभुतपूर्व कामगीरी करीत चिखलीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. सदर परिक्षेमध्ये संपूर्ण भारतभरातील १४०० पेक्षा अधिक फार्मसी महाविद्यालयातील ५०५०८ फार्मसी पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. भारतभरातील तब्बल ५० हजारापेक्षा जास्त विद्यार्थ्यांमधुन अनुराधा फार्मसीचा मनिष तायडे याने १३ वा क्रमांक पटकावला तर अमोल सातपुते हा ७४ व्या स्थानी राहीला. अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसीच्या तब्बल २७ विद्यार्थ्यांनी या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय परीक्षेत यश संपादन करून अनुराधा फार्मसी महाविद्यालय विदर्भातील सर्वात उत्कृष्ट महाविद्यालय असल्याचे पुन्हा एकदा सिध्द केले आहे. ही संपूर्ण विदर्भाकरीता गौरवाची बाब असल्याचे मत फार्मसी कॉलेजचे अध्यक्ष माजी आमदार राहुल बोंद्रे व्यक्त केले.

या स्पर्धेत यश मिळविणाऱ्या जीपॅट उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये मनिष डी. तायडे, अमोल पी. सातपुते, दिपक यु. काळे, वैष्णवी जी. शेरे, गणेश आर. आसबे, गंगाधर शिंदे, अंजली आर. गुघे, जयेश एस. मसने, रूपाली पिंपळे, कु. मयुरी वानखेडे, श्वेता एस. वानेरे, जितेंद्र पी. हिवरकर, राहुल डी. सपकाळ, मानसी एस. गुप्ता, रेणुका जी. झरेकर, स्नेहल एस. गायकवाड, रसिका पी. बामुळकर, चंदन एन. सरकटे, शितल पोहरे, विकास पी. वाणी, सय्यद अमन, दिपक डी. डाबेराव, योगेश व्ही. कव्हाळे, पवन ए. नागरे, धम्मसेन बी. जाधव, सय्यद शुजातुल्ला, विनायक रसाळ, या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. महाविद्यालयाने परीक्षेच्या तयारीच्या दृष्टीने तब्बल २५ हुन अधिक नामांकीत वक्तव्यांची व्याख्यानमाला तसेच १५ हुन अधिक सराव परीक्षा घेतल्या होत्या हे येथे उल्लेखणीय.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवंत्ता यादीत १० पैकी ८-९ विद्यार्थी हे याच महाविद्यालयाचे असतात. भारतातील नामांकीत कंपन्या TCS, Cognizant, Episource, Leben, Wonder Pritam कंपन्या महाविद्यालयात येवून कॅम्पस प्लेसमेंटव्दारा विद्यार्थ्यांना अंतीम परिक्षेपूर्वीच त्यांना नोकरी करीता आकर्षीत नियुक्ती पत्र देत आहेत. म्हणूनच १२ वी नंतर सीईटीव्दारे होणाऱ्या प्रवेशाकरीता या महाविद्यालयाचा कट ऑफ हा या भागातील सर्वोच्च कट ऑफ असतो. अनुराधा फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत घवघवीत यश संपादीत केल्या प्रसंगी महाविद्यालयाचे अध्यक्ष माजी आ. राहुल बोंद्रे, उपाध्यक्ष डॉ. व्हि.आर. यादव, सचिव ॲड.वृषालीताई बोंद्रे, कोषाध्यक्ष सिध्देश्वर वानेरे यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे भरभरून कौतुक करीत अभिनंदन केले आहे. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.आर. बियाणी, प्राचार्य डॉ. आर.एच. काळे, प्राचार्य डॉ.आर.आर.पागोरे, प्रा.यू.एम. जोशी, प्रा.एस.एस.कुलकर्णी, जीपॅट कोऑरडीनेटर प्रा.ई.बी. कोल्हे, प्रा.तोटे यांनी अथक परिश्रम घेतले. (श.प्र.)

# अनुराधा फार्मसीच्या ८ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड

चिखली : अनुराधा औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाच्या ८ विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राईव्हच्या माध्यमातून अकोला येथील लिबेन या फार्मा कंपनीकडून निवड करण्यात आली आहे. अशा प्रकारे शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच यावर्षी आतापर्यंत २७ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली आहे.

कंपनीकडून प्रोडक्शन, क्वालिटी अशुरन्स, क्वालिटी कंट्रोल क्षेत्रामध्ये नोकरीच्या संधी देण्यासाठी हा इंटरव्यू घेण्यात आला. लिबेन कंपनीचे प्रोड्क्शन मॅनेजर मनमथ बाळापूरकर व क्वालिटी कंट्रोल मॅनेजर पुरुषोत्तम खरात यांनी पहिली फेरी महाविद्यालयात १३ मे २०२२ रोजी घेतली. यावेळी १५ विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड करण्यात आली. दुसरी फेरी २३ मे २०२२ रोजी लिबेन लॅबोरेटरी अकोला येथील सीईओ पार्थ शहा यांनी घेऊन ८ विद्यार्थ्यांची निवड केली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये रवींद्र आल्हाट, वैशाली भुतेकर, वैभव दळवी, गजानन जाधव, विशाल शिंदे, मंगेश मोहिते, सोमनाथ शिंदे, नेहा सुर्वे यांचा समावेश आहे. त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले असून अंतिम वर्षाच्या परीक्षा झाल्यानंतर त्यांना रुजू होण्याबाबत कळविले आहे. यासाठी महाविद्यालयाचे अध्यक्ष राहुल बोंद्रे, उपाध्यक्ष डॉ.व्ही.आर.यादव, सचिव ॲड. वृषाली बोंद्रे, कोषाध्यक्ष सिद्धेशवर वानेरे, प्राचार्य डॉ.के.आर.बियाणी, प्राचार्य डॉ.आर.एच. काळे, प्राचार्य डॉ.आर.आर.पागोरे, प्लेसमेंट डायरेक्टर प्रा. यु.एम.जोशी, प्रा.दीप्ती भागवत, प्रा.गोपाल ठेंग आदींनी मार्गदर्शन केले.

# अनुराधा फार्मसीच्या रासेयो निवासी शिबिराचा समारोप

**चिखली, दि. १६ (प्रतिनिधी)**

[illegible]क्यातील साकेगाव येथे अनु[illegible] फार्मसी महाविद्यालयाच्या रासेयो विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप प्रमुख अतिथी परमहंस रामकृष्ण मौनिबाबा शिक्षण संस्थेचे सचिव, माजी आ.राहुल बोंद्रे यांच्या विशेष उपस्थितीत पार पडला.

या समारोपीय कार्यक्रमात माजी आ. राहुल बोंद्रे यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून मार्गदर्शन केले. तसेच मोठी स्वप्ने पहा व त्यासाठी प्रयत्न व मेहनत करण्याचे आव्हान केले कार्यक्रमादरम्यान ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे सुध्दा आयोजन करण्यात आले समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.आर.एच.काळे, विशेष अतिथी अनुराधा ईंग्लिश स्कुलच्या सल्लागार सुजाता कुल्ली व डॉ.शिवशंकर खेडेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास प्रा.डॉ.आशिष गवई, प्रकाश निकाळजे, प्रा.डॉ एस.ए.शिंदे, प्रा.सुरज सगरुळे, प्रा राहुल सरोदे, प्रा.सचिन गाडेकर, प्रा शिवाणी तुपकर, वैभव ठेंग, आशिष सोनुने, सिध्दार्थ निकाळजे, विठ्ठल हुकरे आदी उपस्थित होते. यावेळी शिबिरादरम्यान ग्रामस्थांची मोफत आरोग्य, नेत्र व रक्त तपासणी डॉ.मंगेश मिसाळ, डॉ.कुलदिप भोलाने, विलास गवळी, अर्चना वाघ, भावना कॅम्बेल यांच्याद्वारे करण्यात आली. शिबिरादरम्यान बालयोगी वरद जोशी यांनी योग व प्राणायम सादर केले.

तर मंडळ अधिकारी किशोर पाटील यांनी आपत्ती व्यवस्थापन व सर्पदंश यावर प्रात्यक्षिक सादर केले. चमत्काराचा भांडाफोड, जादुटोना विरोधी कायदा व वैज्ञानिक दृष्टीकोन यावर स्वाती सावजी, प्रवक्त्या अंधश्रध्दा निर्मुलन समिती यांनी प्रात्यक्षिकांसह व्याख्यान दिले शिबीरांतर्गत गावकऱ्यांसोबत चर्चा, मुलांसाठी विविध क्रीडा व



सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. संचालन रसिका बाभुळकर, भाविका सपकाळ, अंकित चिकटे, एश्वर्या वाणी तर आभारप्रदर्शन रितेश पाचपांडे व पल्लवी मांगुळकर यांनी केले.

# अनुराधा फार्मसीमध्ये सेवा श्रमसंस्कार शिबिर उत्साहात

**चिखली**, दि. १० (प्रतिनिधी)




स्थानिक अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसीच्या राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराचे साकेगाव येथे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे सचिव राहुल बोंद्रे यांच्या मार्गदर्शनात डॉ. सत्येंद्र भुसारी यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के. आर. बियाणी होते.

या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. अरुण नन्हई, माजी सभापती प्रकाश निकाळजे, दिलीपराव इंगळे, रमेश लोंखडे, जगन्नाथ लोंखडे, पालकर, प्राचार्य डॉ. आर. एच. पागोरे, कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. ए. शिंदे, प्रा. एस. डी. सगरुळे, सहकार्यक्रम अधिकरी प्रा. राहुल सरोदे, प्रा. सचिन गाडेकर, प्रा. शिवाणी तुपकर, विद्यार्थी प्रतिनिधी वैभव ठेंग, आशिष सोनुने, सिध्दार्थ निकाळजे व विठ्ठल डुकरे उपस्थित यांची प्रमुख उपस्थिती होती. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शिंदे यांनी प्रास्ताविकातून शिबिरात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रकाश निकाळजे व प्राचार्य डॉ. नन्हई यांनी श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातुन ग्रामिण भागातील लोकजीवन, परंपरा, रुढी आत्मसात कराव्या, असे आव्हाहन मार्गदर्शन केले. डॉ. सत्येंद्र भुसारी यांनी प्रतिकुल परिस्थितीला न डगमगता शिक्षणात सर्वोच्च पदवी प्राप्त करावी, असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. बियाणी यांनी दत्तक ग्राम साकेगाव हे आदर्श गाव बनविण्याच्या हेतूने संस्थेचे सचिव राहुल बोंद्रे यांनी या गावाची निवड केल्याचे सांगितले. या शिबिरात योग, व्यायाम व प्रार्थना तसेच हिमोग्लेबीन व रक्तगट तपासणी शिबिर, शेतकऱ्यांच्या पशुंसाठी पशुचिकित्सा शिबिर घेण्यात आले.

# अनुराधा फार्मसीचे रासेयो शिबिर उत्साहात

## सात दिवस राबवले विविध उपक्रम




रासेयो शिबिरात मार्गदर्शन करताना मान्यवर.

लोकमत न्यूज नेटवर्क

बुलडाणा : परमहंस रामकृष्ण मौनिबाबा शिक्षण संस्था संचालित संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलग्नित अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसीच्या रासेयो विषेश श्रमसंस्कार शिबिराचे २४ मार्च रोजी दत्तक ग्राम साकेगाव येथे संस्थेचे सचिव राहुल बोंद्रे यांच्या मार्गदर्शनात डॉ. सत्येंद्र भुसारी, माजी सभापती कृषी उत्पन्न समिती चिखली यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. के. आर. बियाणी होते. यावेळी प्राचार्य डॉ. अरुण नन्हई, प्रकाश निकाळजे, दिलीपराव इंगळे, ज्येष्ठ नागरिक रमेश लोंखडे, जगन्नाथ लोखंडे, पालकर, प्राचार्य डॉ. आर. एच. काळे, प्राचार्य डॉ. पागोरे, कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. ए. शिंदे, प्रा. सगरुळे, सहकार्यक्रमाधिकारी प्रा. राहुल सरोदे, प्रा. सचिन गाडेकर, प्रा. शिवाणी तुपकर, विद्यार्थी प्रतिनिधी वैभव ठेंग, आशिष सोनुने, सिद्धार्थ निकाळजे व विठ्ठल डुकरे उपस्थित होते. शिबिरात २५ मार्च रोजी रक्त तपासणी शिबिर घेण्यात आले. २६ मार्च रोजी मतदान जागृती कार्यक्रम घेण्यात आला. २६ मार्च रोजी पशू चिकत्सा शिबिर घेण्यात आले. उद्घाटनाचे संचालन कांचन पांढरे यांनी केले.

# अनुराधा फार्मसीचे रासेयो शिबिर उत्साहात

## सात्त दिवस राबवले विविध उपक्रम



रासेयो शिबिरात मार्गदर्शन करताना मान्यवर.

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**बुलडाणा :** परमहंस रामकृष्ण मौनिबाबा शिक्षण संस्था संचालित संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलग्नित अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसीच्या रोसेयो विषेश श्रमसंस्कार शिबिराचे २४ मार्च रोजी दत्तक ग्राम साकेगाव येथे संस्थेचे सचिव राहुल बोंद्रे यांच्या मार्गदर्शनात डॉ. सत्येंद्र भुसारी, माजी सभापती कृषी उत्पन्न समिती चिखली यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. के. आर. बियाणी होते. यावेळी प्राचार्य डॉ. अरुण नन्हई, प्रकाश निकाळजे, दिलीपराव इंगळे, ज्येष्ठ नागरिक रमेश लोंखडे, जगन्नाथ लोखंडे, पालकर, प्राचार्य डॉ. आर. एच. काळे, प्राचार्य डॉ. पागोरे, कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. ए. शिंदे, प्रा. सगरुळे, सहकार्यक्रमाधिकरी प्रा. राहुल सरोदे, प्रा. सचिन गाडेकर, प्रा. शिवाणी तुपकर, विद्यार्थी प्रतिनिधी वैभव ठेंग, आशिष सोनुने, सिद्धार्थ निकाळजे व विठ्ठल डुकरे उपस्थित होते. शिबिरात २५ मार्च रोजी रक्त तपासणी शिबिर घेण्यात आले. २६ मार्च रोजी मतदान जागृती कार्यक्रम घेण्यात आला. २६ मार्च रोजी पशू चिकत्सा शिबिर घेण्यात आले. उद्घाटनाचे संचालन कांचन पांढरे यांनी केले.

# बाजार समित्या संपल्याने शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न घटले : ना. सुनील केदार

## राहुल बोंद्रे यांच्या वाढदिवसानिमित्त एमआयडीसीत उपबाजाराचा शुभारंभ

चिखली, दि. ११ (प्रतिनिधी)

**केंद्र शासनाच्या नवीन धोरणानुसार अनेक राज्यांमध्ये बाजार समित्या बंद झाल्या आहेत. ज्या राज्यात बाजार समित्या बंद केल्या त्या राज्यातील शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न मोठ्या प्रमाणात घटल्याचे पाहवयास मिळत आहे. शेतकरी संघटीत असल्यास शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला भाव मिळू शकतो, ज्या प्रमाणे सोने-चांदी कपडा व अन्य उत्पादीत होणाऱ्या मालासाठी चांगल्या बाजाराची गरज असते, त्याचप्रमाणे शेतमालासाठी चांगली बाजारपेठ उपलब्ध होणे गरजेचे असते. त्यासाठी बाजार समितीच्या माध्यमातून चांगले व्यवस्थापन होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन राज्याचे क्रीडा मंत्री सुनिल केदार यांनी केले.**

बुलडाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आमदार राहुल बोंद्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या कृषि उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजाराचे एमआयडीसी परिसरात उद्घाटन करण्यात आले, यावेळी उद्घाटक म्हणून ना. केदार बोलत होते. या कार्यक्रमाला आ. संजय गायकवाड, माजी आमदार रेखाताई खेडेकर, दिलीपकुमार सानंदा, श्याम उमाळकर, संजय राठोड, प्रा. नरेंद्र खेडेकर, बाजार समितीचे मुख्य प्रशासक नंदू सवडतकर, कुणाल बोंद्रे, दीपक देशमाने, सचिन बोंद्रे, समाधान सुपेकर, ज्ञानेश्वर सुरूशे, काशिनाथ बोंद्रे, गजानन पवार, किशोर सोळंकी यांची प्रमुख उपस्थिती होती. राज्यातील महाविकास आघाडी सरकार हे शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे असून शेतकरी टिकला पाहीजे त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्नरत असल्याचे ना. केदार यांनी सांगितले. मान्यवरांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. बाजर समितीचे मुख्य प्रशासक नंदकिशोर सवडतकर तथा प्रशासक मंडळाने ना. केदार यांचा बाजार समितीच्या वतीने सत्कार केला.

### उपबाजार समिती जास्त उत्पादन देईल : बोंद्रे

चिखली कृषि उत्पन्न बाजार समिती ही जिल्ह्यातील महत्वाची बाजार समितीअसून या बाजार समितीने एमआयडीसी परिसरात ३२ एकर जागा घेवून सुमारे ५ कोटी रूपये खर्च करून टिएमसी सारखा प्रकल्प उभारला आहे. या ठिकाणी गुरांचा बाजार व मिर्ची बाजार या उपबाजाराचा शुभारंभ ना.केदार यांच्या हस्ते होत असून येणाऱ्या काळामध्ये हा उपबाजार मुख्य बाजार समितीपेक्षा जास्त उत्पादन देईल, यात असा विश्वास यावेळी बोलताना राहुल बोंद्रे यांनी व्यक्त केला.



यावेळी बाजार समितीचे प्रशासक प्रकाश घुबे, डॉ. संतोष वानखेडे, गजानन परिहार, शेख आरिफ शेख महेबुब, सतिष बाहेकर, संजय खेडेकर, गजानन परिहार, परमेश्वर पवार, अॅड. मनमोहन घेवंदे, शिवराज पाटील, नितीन इंगळे, किसन धोडगे, विलास सुरडकर, रामकृष्ण अंभोरे, रविंद्र भगत, प्रविण वराडे, राजेंद्र पाटील, सुनिल सचिव, माजी संचालक, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, नगसेवक, महाविकास आघाडीचे विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी आभार नंदकिशोर सवडतकर यांनी मानले.

# अनुराधा फार्मसीमध्ये औषध निर्मिती हा औषधी उद्योगातील अविभाज्य घटक या विषयावर वेबिनार संपन्न

चिखली/प्रतिनीधीः अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये ०१ एप्रिल २०२१ रोजी औषध निर्मिती हा औषधी उद्योगातील अविभाज्य घटक या विषयावर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा नामांकित अल्केम लेबॉरेटरीज, बद्दी सिमला येथील असिस्टंट जनरल मॅनेजर पंकज पाटील यांच्या वेबिनारचे ऑनलाईन आयोजन संपन्न झाले. वेबिनारच्या सुरवातीला प्रास्ताविकामधुन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ के




मध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य प्लेसमेंट चे समन्वयक रोजगाराच्या संधी विषयी

# अनुराधा फार्मसीत फार्मा अभ्यासक्रमानंतर विदेशातील फार्मा उद्योगातील सुवर्णसंधीवर चर्चासत्र संपन्न




**चिखली/प्रतिनीधीः** स्थानिक अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयामध्ये बि फार्म, एम फार्म, पी एच डी अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर विदेशामधी फार्मा उदयोगातील सुवर्ण संधी या विषयावर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा असोसिएट डायरेक्टर, बानेर हेल्थ केअर, अमेरिका येथील डॉ. हर्षल हरलालका यांचा वेबिनार दि ०८/०४/२०२१ रोजी संपन्न झाला

कार्यक्रमाच्या

पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व ... करित असल्याचे गौरवोद्‌गार ...

# अनुराधा फार्मसीने इतिहास घडविला...

## राष्ट्रीय पातळीवरील जीपॅट स्पर्धा परिक्षेत महाविद्यालयाचे तब्बल ३५ विद्यार्थी झळकले !




**चिखली/प्रतिनीधीः** अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसीच्या तब्बल ३५ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवरील नामांकित जीपॅट स्पर्धा परिक्षेत दैदीप्यमान यश संपादन करुन महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोविला आहे, सदर जीपॅट स्पर्धा परिक्षेचा निकाल दि .१९ मार्च २०२१ ला जाहीर झाला आहे, शैक्षणिक क्षेत्रामध्ये अनुराधा फार्मसी महाविद्यालय सर्वोत्कृष्ट शिक्षण देणारे महाविद्यालय

मोहीत यावर्षी तब्बल ३५

याप्रसंगी

# अनुराधा ग्रुप ऑफ फार्मसी इन्स्टीटयुटच्यावतीने फार्मा उद्योग नवीन दृष्टीकोन वर वेबिनार संपन्न

देशोन्नती वृत्तसंकलन...

**चिखली** ■ अनुराधा ग्रुप ऑफ फार्मसी इन्स्टीटयुटच्यावतीने २० फेब्रुवारी रोजी फार्मा उद्योग नवीन दृष्टीकोन या विषयावर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा रेडडीज लॅब हैद्राबाद असोसिएट डायरेक्टर हिमांशु जोशी यांचा वेबिनार संपन्न झाला.

संस्थेचे सचिव तथा माजी आ. राहुल बोंद्रे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.आर. बियाणी, प्राचार्य डॉ.आर. एच . कव्हे, प्रा. डॉ .आर.आर.पागोरे ट्रेनिंग अँन्ड प्लेसमेंटचे समन्वयक प्रा . यु .एम . जोशी, डॉ. उप्पला मोहन कुमार, प्रा.पवन फोलाने व ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला .संस्थेचे सचिव तथा माजी आ. राहुल बोंद्रे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणांत महाविद्यालयातील ट्रेनिंग अँन्ड प्लेसमेंट या विभागामार्फत कॅम्पस इंटरव्हयु घेण्याच्या उद्देशाने महाविद्यालयाने महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी विविध कंपन्याच्या उच्चपदस्थ कार्यरत असलेल्या कंपन्याशी विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीकोनातून करार केला असल्याचे



प्रतिपादन त्यांनी केले . महाविद्यालय वेळोवेळी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळण्याच्या दृष्टीकोनातून विविध वेबिनारचे आयोजना विषयी कौतुक केले .

प्रास्ताविकामधुन कार्यक्रमाच्या सुरवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.आर .बियाणी यांनी रेडडीज लॅब हैद्राबाद असोसिएट डायरेक्टर हिमांशु जोशी यांचा परिचय करुन दिला.फार्मसी उद्योगातील रोजगाराच्या संधी याविषयावर हिमांशु जोशी यांनी विद्यार्थ्यांचे फार्मसी अभ्यासक्रमाचे शिक्षण पूर्ण झाल्यावर फार्मसी क्षेत्रामध्ये करिअर घडवितांना मार्केटिंग, प्रॉडक्शन टेक्निकल मॅनेजमेंट, क्लिनीकल रिसर्च, रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट, रेग्युलटरी अफेअर्स या सारख्या कुठल्या क्षेत्रामध्ये आवड हे सर्वप्रथम ठरवुन त्याप्रमाणे संभाषण कौशल्य, संगणक कौशल्य यासारखे विविध कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे असल्यामुळे त्यांनी सांगितले .

फार्मसी उद्योगातील रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट मॅन्युफॅक्चरिंग, रेग्युलेटरी अफेअर्स, मॅनेजमेंट क्लिनीकल रिसर्च, सेल्स अँन्ड मार्केटिंग यासारख्या विविध विभागामध्ये रोजगाराच्या सुवर्णसंधी आहेत .जगामध्ये सर्वात जास्त भारत देश औषध निर्यात करणारा देश असल्यामुळे रेग्युलेटरी अफेअर्स या विभागामध्ये रोजगाराच्या सुवर्ण संधी . तसेच क्लिनिकल रिसर्च मधील स्टॅटीक्सीअन व डाटा कलेक्शन टेक्नीकल मॅनेजमेंट या विभागामध्ये मुलामुलींना रोजगाराची संधी उपलब्ध आहेत .

ड्रग्जस इन्स्पेक्टर, टेक्नीकल ॲडव्हायझर रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट, सेट्रल लॅब, सिव्हिल हॉस्पीटल, रेल्वे फार्मसी आर्मी याठिकाणी फार्मासिस्टिया सारख्या सरकारी नोकरी उपलब्ध आहेत.फार्मसी उद्योग भरभच कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन प्रा .यु .एम. जोशी यांनी केले. (ता.प्र.)

# अनुराधा फार्मसीचे ११ विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत

**चिखली**, दि. ११ (प्रतिनिधी)



स्थानिक अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसीच्या तब्बल ११ विद्यार्थ्यांनी दैदीप्यमान यश संपादित करीत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. त्यांच्या यशाने महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

अमरावती विद्यापीठाने बीफार्म अभ्यासक्रमाच्या पहिल्या येणाऱ्या दहा विद्यार्थ्यांची मेरिटची गुणवत्ता यादी प्रकाशित केली. दहापैकी अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसीचे आठ विद्यार्थी यामध्ये झळकले. एम.फार्म क्वॉलिटी अशुरन्स या पदव्युत्तर पदवी विद्या शाखेतून एका विद्यार्थिनीने यश संपादन केले.बी. फार्म या औषधनिर्माणशास्त्र अभ्यासात विद्यापीठातून अव्वल स्थान मिळवून आपले अभ्यासक्रमातील नेतृत्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे



२१ फार्मसी महाविद्यालयातून विद्यापीठात प्रथम येणाऱ्या दहा विद्यार्थ्यांची दीक्षांत समारंभापूर्वी गुणवत्ता यादी जाहीर करते. उच्च विद्याविभूषीत प्राध्यापकांकरवी उच्च व दर्जेदार शिक्षण देणारे फार्मसी क्षेत्रातील अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी हे एकमेव महाविद्यालय ठरले आहे.विद्यापीठातून प्रथम मेरिट येण्याचा मान जयश्री मानवतकर (८.६४ गुण) हिने मिळविला. द्वितीय भाग्यश्री भुतेकर (८.६१), चतुर्थ आंचल कांबळे (८.३३), पाचवी अश्विनी भुतेकर (८.३२) सहावा मेरिट मनोहर गदादे (८.३०), सातवी किरण भारसाकळे (८.२९), नववा मेरिट मारुती दिवटे (८.२६) तर ८.२५ गुण घेऊन श्वेता लेंभे, सीमा मानमोडे व शेख मोहसिन शेख मोहंमद हे तिघे दहावे मेरिट आले. एम. फार्मसी क्वॉलिटी अशुरन्स या पदव्युत्तर पदवी विद्याशाखेतून निशा गडीया (८.४८) ही तिसरी आली.

संस्थेचे अध्यक्ष तात्यासाहेब बोंद्रे यांनी या भागातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण मिळावे या उददेशाने सुमारे २६ वर्षांपूर्वी महाविद्यालयाची स्थापना केली. या यशवंतांचा तात्यासाहेब बोंद्रे, संस्थेचे सचिव तथा माजी आमदार राहुल बोंद्रे, उपाध्यक्ष डॉ. व्ही.आर. यादव, संस्थेचे विश्वस्त सिद्धेश्वर वानेरे, सलिमोद्दीन काझी, आत्माराम देशमाने, अनंतराव सराफ, प्राचार्य डॉ. के. आर. बियाणी, प्राचार्य डॉ. आर.एच. काळे यांनी सत्कार केला.

# जयश्री मानवतकर विद्यापीठातून पहिली







**◆ चिखली, १२ फेब्रुवारी**

येथील अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसीच्या तब्बल ११ विद्यार्थ्यांनी देदीप्यमान यश संपादित करीत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीमध्ये झळकण्याचा बहुमान प्राप्त केला असून या यशाने महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

अमरावती विद्यापीठाने बी.फार्म अभ्यासक्रमाच्या पहिल्या येणाऱ्या १० जणांची मेरिट गुणवत्ता यादी नुकतीच ५ फेब्रुवारी रोजी प्रकाशित केली. एकूण १० मेरिटपैकी अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसीच्या ८ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त करण्याचा बहुमान मिळविला आहे. एम.फार्म क्वॉलिटी अशुरन्स या पदव्युत्तर


पदवी विद्या शाखेतून एका विद्यार्थिनीने गुणवत्ता यादीत येण्याचा बहुमान पटकाविला आहे.

जाहीर झालेल्या विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत विद्यापीठातून प्रथम मेरिट येण्याचा मान जयश्री मानवतकर हिने मिळविला असून तिने ८६.४ टक्के गुण संपादन केले. तर दुसरे मेरिट स्थान भाग्यश्री भुतेकर हिने पटकाविले असून तिने ८६.१ टक्के गुण संपादन केले आहे. चौथे मेरिट स्थान आंचल सुनिल कांबळे हिने पटकाविले असून तिने ८३.३ गुण संपादन केले. पाचवे मेरिट स्थान अश्विनी भुतेकर हिने पटकाविले असून तिने ८३.२ टक्के गुण संपादित केले. सहावे मेरिट स्थान मनोहर गदादे याने पटकाविले असून त्याने ८३.० टक्के गुण संपादन केले. सातवे मेरिट स्थान किरण भारसाकळे हिने पटकाविले असुन तिने ८२.९ गुण संपादन करुन पटकाविले. नववे मेरिट स्थान मारोती दिवटे याने ८२.६ टक्के गुण संपादन करुन पटकाविले. दहावे मेरिट स्थान अनुक्रमे श्वेता लेंभे, सीमा मानमोडे, शेख मोहसीन शेख मोहम्मद या तिघांनी संपादन करुन ८.२५ टक्के गुण प्राप्त केले.

तर एम.फार्मसी क्वालिटी अशुरन्स या पदव्युत्तर पदवी विद्याशाखेतून गुणवत्ता यादीत तिसरे स्थान निशा गढिया हिने पटकाविले असून तिने ८४.८ टक्के गुण संपादन केले.

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केल्याने संस्थेचे अध्यक्ष तात्यासाहेब बोंद्रे, संस्थेचे सचिव तथा माजी आ.राहुल बोंद्रे, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. व्ही. आर. यादव, सिद्धेश्वर वानेरे, सलीम काझी, आत्माराम देशमाने, अनंतराव सराफ, प्राचार्य डॉ. के. आर. बियाणी, प्राचार्य डॉ. आर. एच. काळे, प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी एका समारंभात यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार केला. ◀(तभा वृत्तसेवा)

## अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसीचे

# स्पर्धा परीक्षेत ३५ विद्यार्थी झळकले

देशोन्नती वृत्तसंकलन...

**बुलढाणा** ▪ अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसीच्या तब्बल ३५ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवरील नामांकित जीपॅट स्पर्धा परिक्षेत दैदिप्यमान यश संपादन करुन महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोविला आहे. सदर जीपॅट स्पर्धा परिक्षेचा निकाल १९ मार्चला जाहीर झाला आहे. शैक्षणिक क्षेत्रामध्ये अनुराधा फार्मसी सर्वोत्कृष्ट शिक्षण देणारे महाविद्यालय असल्याचे जीपॅट स्पर्धेतील अभुतपुर्व यशानेपुन्हा एकदा सिध्द केले आहे.

मागील वर्षी जीपॅट स्पर्धा परिक्षेत महाविद्यालयाच्या २० विद्यार्थ्यांनी यश संपादन केले होते, महाविद्यालयाने मागील वर्षीच्या निकालाचा विक्रम मोडीत यावर्षी तब्बल ३५ विद्यार्थ्यांनी परिक्षेत यश संपादित करित नवा विक्रम



प्रस्थापित केला आहे. जीपॅट परिक्षेत विद्यार्थ्यांनी यश संपादन केल्याबददल महाविद्यालयात जल्लोष करण्यात आला. यामध्ये जीपॅट उत्तीर्ण विद्यार्थी, प्राचार्य व प्राध्यापकवृंद व कर्मचारी सहभागी झाले होते.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या वतीने संस्थेचे सचिव माजी आ.राहुल बोंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली जीपॅट उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा छोटयाखानी कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केल्याबददल संस्थेचे अध्यक्ष कर्मयोगी तात्यासाहेब बोंद्रे, संस्थेचे सचिव माजी आ.राहुल बोंद्रे, डॉ.व्हि. आर.यादव, सिध्देश्वर वानेरे, सलिमोद्दीन काझी, आत्माराम देशमाने, अनंत सराफ, प्राचार्य डॉ.के.आर. बियाणी, प्राचार्य डॉ.एच.आर.काळे, प्राचार्य डॉ .आर .आर .पागोरे, प्राध्यापकवृंद, कर्मचारीवृंद यांनी अभिनंदन केले. जीपॅट समन्वयक प्रा. सुरज सगरुळे, प्रा.पोपळघट, प्रा. आदित्य गटटाणी, डॉ.दुधे, डॉ.काळे यांनी परिक्षेकरिता परिश्रम घेतले. सुत्रसंचालन प्रा.यु.एम.जोशी यांनी केले. (का.प्र.)

# अनुराधा फार्मसीत विदेशातील सुवर्णसंधीवर चर्चासत्र

चिखली, दि. ९ (प्रतिनिधी)

अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयामध्ये बि.फार्म, एम.फार्म, पी एच डी अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर विदेशामधील फार्मा उद्योगातील सुवर्ण संधी या विषयावर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा असोसिएट डायरेक्टर, बानेर हेल्थ केअर, अमेरिका येथील डॉ. हर्षल हरलालका यांचा वेबिनार ८ एप्रिल रोजी पार पडला.

प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.आर.बियाणी यांनी डॉ.हर्षल हरलालका यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच प्रास्ताविकातून अनुराधा फार्मसी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी विदेशात उच्चपदस्थ कार्य करित असल्याचे गौरवोद्गार काढले. विदेशात फार्माउद्योगातील रोजगाराच्या सुवर्ण संधी या विषयीची माहिती मिळावी या उद्देशाने संस्थेचे सचिव तथा माजी आ. राहूल बोन्द्रे यांच्या कल्पकतेतून सदर वेबिनारचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के. आर.बियाणी, प्राचार्य डॉ.आर.एच.काळे, प्राचार्य डॉ.आर.आर.पागोरे,



ट्रेनिंग प्लेसमेंटचे समन्वयक प्रा.यु.एम.जोशी, डॉ.उप्पला मोहन कुमार, प्रा.पवन फोलाने, प्रा.एस.एस.कुळकर्णी यांच्या सह ३५० विद्यार्थी वेबिनार मध्ये सहभागी झाले होते. संचालन व आभारप्रदर्शन प्रा.यु.एम.जोशी यांनी केले.

# अनुराधा फार्मसी श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

**चिखली, दि. ८** (प्रतिनिधी)

अनुराधा कॉलेज ऑफ फार्मसी, राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीराचा समारोप प्रमुख अतिथी पंढरीनाथ टेकाळे, सरव्यवस्थापक अनुराधा अर्बन बँक चिखली यांच्या उपस्थितीत झाला.

अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. के. आर. बियाणी यांनी भुषविले. यावेळी प्रकाश निकाळजे, चंद्रकला निकाळजे, दामोधर इंगळे, सुनिल निकाळजे, कृष्णा जाधव, लालसिंग परीहार, अशोक निकाळजे, अंबादास इंगळे, दिलीप इंगळे, अंकुश बोराडे, बी. टी. तायडे, गुलाबसिंग परिहार, प्रा. शैलेश भराड, प्रा. राहुल सरोदे, प्रा. सुरज सगरुळे, प्रा. चित्ते सोनाजी भारुडकर, सिध्दार्थ निकाळजे, विठठल डुकरे उपस्थित होते.

बालयोगी वरद जोशी यांच्याकरवी योग व प्राणायामचे धडे देण्यात आले. प्राचार्य डॉ. के. आर. बियाणी, प्रा. अभय साखरे, प्रशांत सरदार यांच्यादवारे जेनेरीक औषधीच्या फायदयाविषयी जनजागृती करण्यात आली. गावकयांची मोफत नेत्र तपासणी डॉ. दिपक बंगाळे, डॉ. राहुल जोशी यांच्या दवारे करण्यात आली. प्रसंगी मोफत औषधींचे वितरण करण्यात आले.

१५५ रूग्णांची तपासणी करण्यात आली. पशुचिकीत्सा शिबिराअंतर्गत १७५ पशुंची तपासणी करून लसीकरण सहायक आयुक्त डॉ. वाय. एस. रगतवान, डॉ. शशीकांत दांडगे डॉ. गायकवाड, डॉ. सागर गवई यांच्या करवी करण्यात आले. नायब तहसीलदार भास्कर वाघ स्पर्धापरीक्षा, शरदचंद्र पाटील यांचे आपत्ती व्यवस्थापन, प्रमोद टाले यांचे विवेकानंद व युवक या विषयांवर व्याख्यान संपन्न झाले. सुत्रसंचालन श्रीकृष्ण उन्हाळे, श्रेया वडतकर तर आभार प्रदर्शन प्रा. राहुल सरोदे यांनी केले.

